## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर
## करारबध्द पध्दतीने मासिक मानधनावर मुलाखतीद्वारे नेमणुकी बाबत

मा. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत शहरस्तरीय तांत्रिक कक्ष (CLTC) करिता अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागासाठी करारबध्द पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधीमध्ये मासिक मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे नियुक्तीसाठी मुलाखतीकरिता खालील दर्शविलेल्या पदांसाठी पात्र अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

तरी संबधित पात्र अर्जदार धारकांनी शैक्षणिक पात्रता, अनुभव दाखला व तद्नुषंगिक आवश्यक सर्व प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रतीसह जोडलेला अर्ज मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचे नावे करुन अर्जासह दिनांक ०९ / ०१ / २०२३ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यत अहमदनगर महानगरपालिका, औरंगाबाद रोड, अहमदनगर या कार्यालयामध्ये पोहचतील अशा रितीने विहीत मुदतीत सादर करावीत, विहीत वेळेनंतर / दिनांकानंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत, अपुर्ण स्वरुपातील, स्वाक्षरी नसलेले, अर्हता व अनुभव धारण करीत नसलेले अर्ज मुलाखत व निवड प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद संबंधितांनी घ्यावी. याबाबत मुलाखत व निवड प्रक्रियेमधील बदल अथवा रद्द तसेच अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी राखून ठेवण्यात आलेला आहे, **सदर करारबध्द पध्दतीने नियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

| अं. क्र | तात्पुरत्या स्वरुपात पदांचे नांव | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता | मासिक मानधन रु. |
|---|---|---|---|---|
| १ | सिव्हील इंजिनियर | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठातून बीई सिव्हील हि पदवी उर्तीर्ण व प्रत्यक्ष कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | ३५,०००/- |
| २ | टाऊन प्लॅनिंग स्पेशालिस्ट | १ | पोस्ट ग्रॅज्युएट इन अर्बन प्लॅनिंग अथवा अर्बन प्लॅनिंग किंवा रिझनल प्लॅनिंग मध्ये पदवी व ३ ते ५ वर्षाचा अर्बन प्लॅनिंग मधील परवडणारी घरे / झोपडपट्टी पुनर्वसन मध्ये कामाचा अनुभव | ३५,०००/- |
| ३ | एमआयएस स्पेशालिस्ट | १ | बोर्ड ऑफ टेक्निकल एजुकेशन मान्यता प्राप्त तंत्रनिकेतन कॉलेज मधुन डिप्लोमा इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनियरींग हि पदवी उर्तीर्ण व प्रत्यक्ष कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. | २५,०००/- |

वरील प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने संबंधित पात्र उमेदवारांच्या मुलाखती बाबत खालील प्रमाणे नमूद केल्यानुसार माहिती वेळापत्रक.

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवारांचे अर्ज स्विकृत | प्रसिध्द जाहिरातीच्या दिनांकांपासून ते दिनांक ०९/०१/२०२३ पर्यत. |
| २ | उमेदवारांचे प्राप्त अर्जाची छाननी | दिनांक ११/०१/२०२३ ते दिनांक १३/०१/२०२३. |
| ३ | पात्र अर्जदारांची प्रसिध्द यादी | दिनांक १६/०१/२०२३ |
| ४ | पात्र उमेदवारांची थेट पध्दतीने मुलाखत | दिनांक १८/०१/२०२३ दुपारी १ वाजता. |

## मासिक मानधनावर नियुक्तीसाठी अटी व शर्ती

१. संबधितांची सदरची नियुक्ती मासिक वेतन तत्वाःप्रमाणे करारबध्द पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपातील कालावधी करिता असल्याने मा.प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत शहरस्तरीय तांत्रिक कक्षास प्राप्त होणा-या अनुदानातुन सदरचे मासिक वेतन अदा करण्यात येईल.

२. सदर मासिक वेतना व्यतिरिक्त शासन सेवा व शर्ती अंतर्गत महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती व अटी) नियम १९८१ नुसार सदरची नियुक्ती नसल्याने त्यानुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी, तसेच कायम सेवेच्या कोणत्याही प्रकारचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. निवड झाल्यानंतर नियुक्त धारकांनी मासिक मानधनावर करारबध्द पध्दतीने रुजु होणे पुर्वी पोलीस प्राधिका-याकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र व मा.जिल्हा शल्य चिकित्सक,अहमदनगर यांचेकडील सक्षम असलेबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

४. नियुक्तीधारकांचे सदर करारबध्द नियुक्ती कालावधीतील काम समाधानकारक न आढळल्यास व त्यांचे सेवा विषयक काही

तक्रारी उद्भवल्यास पुर्वसूचना न देता दिलेली मासिक मानधनावरील करारबध्द पध्दतीने नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधित नियुक्ती धारकावर राहील.

५. सदर निवड झालेल्या संबधितांची मासिक मानधनावरील करारबध्द नियुक्तीचा कालावधी समाप्तीनंतर त्यांना कोणतेही अधिकार राहणार नाहीत.

६. सदर नियुक्ती पुर्णतः मासिक मानधन तत्वानुसार कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरुपात असल्याने सदर नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सेवेत कायम नियुक्ती होणे बाबत व कायम सेवेचे कुठल्याही प्रकारचे फायदे मिळणे करीता नियुक्तीधारकास मा.न्यायालयात अथवा मा.उच्च न्यायालयात याबाबत दाद मागता येणार नाही,सदरची मुदत संपल्यानंतर सदरचा करारबध्द नियुक्ती आदेश हा अपोआप व्यपगत होईल.

७. नियुक्त झालेल्या संबधितांना नियुक्ती मानधनावरील कालावधीमध्ये कार्यालयीन परवानगी शिवाय त्यांना कार्यक्षेत्र सोडता येणार नाही.

८. निवड झालेल्या संबधितांना सदर नियुक्ती कालावधीतील मानधनावरील सेवेचा राजीनामा दयावयाचा असेल तेव्हा मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे १५ दिवसाच्या आतं त्यांना याबाबत पुर्व सुचना म्हणुन नोटीस दयावी लागेल.

९. सदर मासिक वेतन कालावधीतील नियुक्ती करीता दिलेली माहिती खोटी असल्याचे निष्पन्न झाल्यास उपरोक्त करारबध्द नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येवून सेवा समाप्त करण्यांत येईल.तसेच संबधित उमेदवारांनी यापुर्वी नोकरी बाबत अर्ज दिलेला असल्यास यापुर्वीचा तो अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१०. विवाहीत असल्यास एक पती किंवा एक पत्नी असावे.

११. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम ०५ मधील प्रतिज्ञा पत्राचा नमुना अ (नियम ४) अपत्याबाबतचे प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.

१२. तात्पुरत्या स्वरुपात सदर करारबध्द नियुक्ती कालावधीमध्ये सेवेत हलगर्जीपणा, निष्काळजीपणा,व इतर काही त्रुटी उद्भवल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी ही नियुक्त झालेल्या संबधितांवर राहील व त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.

१३.मुलाखती बाबतचे सर्व अधिकार व हक्क,पदांच्या फेरबदल व अटी व शर्ती बाबतचा अधिकार आणि सदर जाहिराती मधील पदे भरणे बाबत कोणताही अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांना राहील,कोणताही किंवा सर्व अर्ज काही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवीत आहेत, व याबाबत कोणत्याही अर्जदारास त्याबाबत लेखी कळविण्यात येणार नाही.

१४. मासिक मानधनावरील करारबध्द नियुक्ती झालेल्या संबधितांनी सदरचा नियुक्ती आदेश मिळताच ७ दिवसाचे आत संबधित विभागात हजर व्हावे लागेल अन्यथा सदर दिलेला नियुक्ती आदेश तात्काळ संपुष्टात आलेबाबत समजण्यात येईल.

१५. सदर करारबध्द नियुक्त झालेल्या संबधितांनी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे तसे लेखी करारपत्र रु. १००/- च्या मुद्रांकावर साक्षांकीत करुन देणे बंधनकारक आहे.

**मा.आयुक्त यांचे आदेशान्वये.**

**उप-आयुक्त**
**अहमदनगर महानगरपालिका**